सामाजिक वनीकरण विभागातील निर्माण केलेल्या वनसर्व्हेक्षकांच्या पदांना मुदतवाढ देणेबाबत. (२ पदे)

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एफएसटी-०३/१९/प्र.क्र.६५/फ-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० मार्च, २०१९

वाचा :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.७७/१८-१९/२०९४, दि.२२.०२.२०१९
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि -२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२१.०२.२०१९.
३. शासन निर्णय क्र.एफएसटी-१०/१७/प्र.क्र.५९१/फ-४, दि.२१.०३.२०१८ व दि.२४.१०.२०१८.

प्रस्तावना :-

मा.सर्वोच्च न्यायालयाने M/s Lafarge mining Limited प्रकरणी दाखल याचिकेत दि.०६.०७.२०११ च्या निर्णयानुसार नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण व संवर्धन करणेकरीता सर्व राज्यांनी Decision Support System (DSS) ला सहाय्यभूत प्रणाली म्हणून Dedicated GIS Cell कार्यान्वीत करण्याबाबत निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यात नागपूर व पुणे येथे GIS Cell सुरु करण्यात आला आहे. सदर GIS Cell चे बळकटीकरण करण्यासाठी सर्व्हेक्षकाची ५ पदे मुख्य वनसंरक्षक (कार्यआयोजना), पूर्व नागपूर यांचे कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली आहे. सदर ५ पदांपैकी २ पदे ही (२४०६ ८५२४) या लेखाशिर्षांतर्गत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त येतात. सदरची २ अराजपत्रित अस्थायी पदांना सन २०१८-१९ मध्ये दि.०१.०३.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ पर्यंत शासन निर्णय दि.२१.०३.२०१८ व दि.२४.१०.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली असून सदर पदांचा आकृतीबंधामध्ये समावेश करण्यात आला आहे. आता सदर पदांना दि.०१.०३.२०१९ च्या पुढे मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर २ पदांना पुढील मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

मुख्य वनसंरक्षक (कार्यआयोजना), पूर्व नागपूर यांचे नियंत्रणाखालील सर्व्हेक्षक संवर्गातील २ पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालु ठेवण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे :-

अ) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विविव्ही-१०९७ /प्र.क्र.२६ /९७ /अर्थसंकल्प-१९, दि.२०.१२.१९९७ नुसार अस्थायी पदांना मुदतवाढ देताना कर्मचारीवृंदाच्या मानकाचे पुनर्विलोकन योजना / कार्यक्रम यांचा आढावा घेण्यात यावा.

ब) अधिसंख्य पदे निवृत्ती अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे रिक्त झाली असल्यास सदर पदे आपोआपच व्यपगत होतील.

क) जी पदे ठराविक कालावधीसाठी मंजूर करण्यात आली आहेत, अशी पदे ठराविक कालावधी संपल्यानंतर निरसित करण्यात यावीत.

ड) प्रपत्र क्र.१ मधील पदांसाठी वेतनावरील येणारा खर्च प्रपत्रात दर्शविलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वर्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर आदेश हे वित्त विभागाच्या क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आपुक, दि.२१.०२.२०१९ रोजीच्या निर्णयानुसार प्रशासकीय विभागाना दिलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१६३०१९५२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Babasaheb S. Shinde

Digitally signed by Babasaheb S. Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1706e7b903eb05a5f1c405f3795499452af658b876e10b223a0cef893b6b6689, cn=Babasaheb S. Shinde
Date: 2019.03.20 16:39:59 +05'30'

**(बा.सि.शिंदे)**
**कक्ष अधिकारी**
**महसूल व वन विभाग**

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत-**

१. मुख्य वनसंरक्षक (कार्यआयोजना), पूर्व नागपूर.
२. सहाय्यक संचालक, अर्थसंकल्प नियोजन व विकास विभाग सामाजिक वनीकरण, नागपूर.
३. सर्व वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग.
४. सर्व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग,
५. महालेखापाल, (लेखा परिक्षा , लेखा व अनुज्ञेयता ) ,महाराष्ट्र १ व २
६. सर्व कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
७. निवड नस्ती फ-४, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**<u>प्रपत्र १</u>**

## <u>शासन निर्णय, महसूल व वन विभाग,</u>

## क्रमांक एफएसटी-०३/१९/प्र.क्र.६५/फ-४

## दिनांक: २० मार्च, २०१९ चे सहपत्र योजनेत्तर कर्मचारी वृंद

| अ.क्र. | पदनाम | पद | ज्या लेखाशीर्षतून खर्च करावयाच्या आहे ते लेखाशीर्ष |
|---|---|---|---|
| १. | सर्व्हेक्षक | २ | मागणी क्र. सी ०७-, २४०६ वनीकरण व वन्यजीवन ०१-वनीकरण, ००१ संचालन व प्रशासन, (०१), संचालन व प्रशासन महासंचालक, सामाजिक वनीकरण मुख्य वनसंरक्षक, (०१),(०६) महासंचालक,सामाजिक वनीकरण व मुख्य वनसंरक्षक (योजनेत्तर ) (२४०६ ८५०६) व ) () ०१ (०७) उपमहासंचालक सामाजिक वनीकरण व मुख्य वनसंक्षक (योजनेत्तर) २४०६ ८५१५ आणि (०१)(०८)उपसंचालक सामाजिक (योजनेत्तर) वनीकरण विभाग २४०६ ८५२४ |